International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.1 Sept – Oct 2020

# विशेष लेखकाचा अभ्यास : पद्धत व प्रक्रिया

**Dr. Pawar Kisan Karnasaheb**
Associate Professor , Dept. Of Marathi
Uma Mahavidyalaya Pandharpur, Dist- Solapur, 413304(MS)
Email- kisanpawar1964@gmail.com

**प्रास्ताविक :-**

साहित्याचा अभ्यास विविध पद्धतींनी केला जातो. कधी एखादीच साहित्यकृती घेऊन अभ्यास केला जातो, तर कधी कालखंडाचा अभ्यास केला जातो. कधी वाङ्मय प्रकारानुसार अभ्यास केला जातो तर कधी सामाजिक, मानसशास्त्रीय दृष्टीनेही केला जातो. तेव्हा एका विशेष लेखकाचा अभ्यास करायचा म्हणजे काय करायचे, असा प्रश्न पडतो अशा अभ्यासाची पद्धत म्हणजे लेखकाच्या चरित्राच्या अनुषंगाने करायचा असा अभ्यासही काही अभ्यासकांनी केला आहे.

**लेखकाच्या चरित्र अभ्यासाचे महत्व :**

कलाकृती मागील सर्वात उघड दिसणारे कारण म्हणजे तिचा निर्माता, अर्थात लेखक आणि म्हणून साहित्याभ्यासाची सर्वात प्राचीन व सुप्रतिष्ठित पद्धत म्हणजे लेखकाचे व्यक्तिमत्व व जीवन यांच्याद्वारे केलेले स्पष्टीकरण. साहित्यिक आणि त्याची साहित्य निर्मिती प्रक्रिया यांच्या मनोविज्ञानाचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी लागणारी साधन सामग्री म्हणून आपणास लेखकांच्या चरित्राकडे पाहता येईल. चरित्र हे साहित्यनिर्मितीवर वा निर्मितीच्या कारणावर प्रकाश टाकू शकते. आपले लक्ष्य केंद्र मानवी व्यक्तिमत्वाच्या दिशेने सरकते. चरित्राला कलात्मक निर्मितीच्या मनोविज्ञानाची साधन सामग्री मानणारा ठरतो.[१] प्रत्येक देशात थोड्याफार प्रमाणावर वाङ्मय आणि चरित्र याबद्दल खूप चर्चा करण्यात आलेली आहे. लेखकाच्या साहित्याबद्दल चर्चा करणारी अनेक मासिके, नियतकालिके उपलब्ध आहेत. यामुळे लोकांच्या भावना, त्यांच्याबद्दलचा आदर त्यांची लोकप्रियता याविषयीची कल्पना येते.[२] चरित्राचे आणि वाङ्मयाचे अनुबंध उलगडून दाखवावे लागते. त्यासाठी लेखकाचे चरित्र सिद्ध करावे लागते. त्यासाठी हयात असलेल्या लेखकाच्या गाठीभेटी घेणे महत्वाचे ठरते. त्यांच्याशी साधलेल्या संवादातून त्यांचे चरित्र उलगडण्याची शक्यता असते.

चरित्राच्या साहाय्याने साहित्याकृतीमधील काही गुंते उलगडू शकतात. पण याचा परिणाम उलटही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा प्रश्न अभ्यासकांपुढे उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. पुष्कळदा एखाद्या लेखकाचे आयुष्य स्वतंत्रपणे अर्थपूर्ण असते. त्याला एक व्यक्ती म्हणून महत्व असते. पण साहित्याकृतीच तेवढ्या महत्वाच्या असतात असे आपणास ठामपणे म्हणता येत नाही. म्हणूनच त्या त्या लेखकाच्या साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

काल्पनिक विधाने व विशेषत: नाटकाच्या वाक्यातून लेखकाच्या चरित्राच्या दृष्टीने अधिकृत ठरणारी अनुमाने कोणतीही काढू शकत नाही. जीवनातील निराशमय कालखंडातून जात असताना शेक्सपिअरने आपल्या शोकांतिका नि कटू सुखांतिका रचल्या व 'टेंपेस्ट' मध्ये त्याच्या चित्तवृत्तीनां थोड्याफार संथपणा लाभला असे वॉरेन याचे म्हणणे आहे.

**लेखकाच्या मुलाखतीचे महत्व :**

एका विशेष लेखकाचा अभ्यास कताना लेखकाच्या चरित्राचा अभ्यास जसा महत्वाचा ठरतो. तितकेच महत्व अभ्यासाकडून घेतलेल्या लेखकाच्या मुलाखतीला आहे. जीवनविषयक लेखकाचा दृष्टीकोन, लेखकाला कळलेले सत्य समजून घेण्यासाठी निश्चितच मुलाखतीतून स्पष्ट होण्याची शक्यता असते. शेवटी विशेष लेखक म्हणून अभ्यास

करताना त्याची वाटचाल समजून घ्यावी. त्याचा लेखनाचा प्रारंभ, त्यामागील प्रेरणा, त्याचा पुढे होत गेलेला विकास, त्यातील खाचखळगे आणि परिवर्तने, लेखनातील चढ-उतार अशा पद्धतीने एक आलेख काढावाच लागतो.[३] एका विशेष लेखकाचा अभ्यासासाठी मुलाखत अपरिहार्य असल्याचे दिसून येते.

**लेखकाचे अनुभवक्षेत्र आणि साहित्यातील चित्रणक्षेत्र :**

प्रत्येक लेखकाचे विशिष्ट असे अनुभवक्षेत्र व चित्रणक्षेत्र असते. त्यांच्या लेखनामध्ये विविध जीवनस्तर येताना दिसतात. जसे ग्रामीण अनुभवक्षेत्र, शहरी अनुभवक्षेत्र असे अनेक अनुभवक्षेत्र आहेत. तरीही त्याच्या चित्रणाचे विशिष्ट केंद्र असते. कथा-कादंबऱ्यातील घटना शहरात घडली असतानाही त्या विषयीचे चित्रणक्षेत्र मात्र ग्रामीण स्तरावरचे असते. उदा. 'लव्हाळी' या कादंबरीमध्ये मुंबईमध्ये घटना घडलेली आहे पण प्रत्यक्ष आलेले चित्रण क्षेत्र मात्र कोकणातील ग्रामीण भागाचे आहे. त्यामधील पात्रे ही मुंबईतील नसून ती कोकणातील आहेत. म्हणजेच प्रत्येक लेखकाचे स्वत:चे म्हणून असे खास चित्रण क्षेत्र असते. तेव्हा एका विशेष लेखकाचा अभ्यास करताना लेखकाचे चित्रणक्षेत्र कोणते आहे याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. जीवनक्षेत्र, अनुभवक्षेत्र, चित्रणक्षेत्र आणि चिंतनक्षेत्र यामधील अनुबंध शोधल्याशिवाय एका विशेष लेखाकाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. अनुबंध शोधल्याने लेखकाचे, त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यकृतीचे आकलन होण्यास आणि साहित्याचे अचूक मूल्यमापन करण्यास मदत होते.

लेखकाचे अनुभव क्षेत्र ध्यानात आले की,अभ्यासकाला लेखकाने किती खोलवर बुडी मारलेली आहे चित्रण क्षेत्रावरून समजण्यास मदत होत. चित्रणक्षेत्र छोटे वा मोठे असेल लेखकाच्या दृष्टीने ते मोठेच असते. कथा कादंबरी साहित्य प्रकारातून लेखन करणाऱ्या लेखकाचे चित्रण क्षेत्र एखादा भूप्रदेश असतो. तेव्हा तो लेखक त्या भूप्रदेशाला शोधकपणे पाहिलेले आहे त्याच बरोबर त्या भूप्रदेशाची किती परिमाणे लेखकाच्या हाती लागलेली आहेत याचा अभ्यासकाला नेमकेपणाने शोध घेता येईल. अर्थातच हा शोध त्या भूप्रदेशाचे आणि मानवाचे सबंध कोणत्या प्रकारचे आहेत. ते लेखकाला शोधाता आले आहे का? यासंबंधीचा विचार अभ्यासाकाला करणे गरजेचे आहे.

**लेखकाची जीवनदृष्टी :**

लेखकाकडून मानवाचा शोध घेत असतानाच मानवी जीवनाचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न होतो. त्यासाठी प्रत्येक लेखकाच्या जीवनदृष्टीवर मानवी जीवनाचा अन्वयार्थ अवलंबून असतो. प्रत्येक लेखकाची कोणती ना कोणतीतरी जीवनदृष्टी असते. ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्मितीच्यावेळी कार्यरत झालेली असते. लेखकाला आलेला एखादा अनुभव जेंव्हा अनुभव म्हणून निवडत असतो तेंव्हा तो अनुभव लेखकाला लक्षणीय वाटतो. अनुभवाचे हे लक्षणीय रूप त्याच्याजवळ असणाऱ्या अनुभवातील संवेदनशीलतेप्रमाणे लक्षणीय रूप प्राप्त होईलही. अनुभावाचे वेगळेपण लेखकाच्या जीवनदृष्टीवरच आधिक अवलंबून असते. तेव्हा लेखक मानवी जीवनाचा अन्वयार्थ कसा लावतो याविषयीचा शोध घेणे या दृष्टीने या अभ्यासाचे महत्व आधिक आहे असे म्हणता येईल.

**लेखकाची वाङ्मयीन दृष्टी :**

लेखक आपल्या साहित्यातून मानवी जीवनासंबंधी कोणता अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचा शोध घेताना अभ्यासकांनी त्या लेखकाचा साहित्याकडे पाहण्याचा दुष्टीकोन कोणता आहे हे ध्यानात घेऊन तसा शोध आपल्या प्रबंधातून घेणे आवश्यक आहे. बऱ्याच लेखकांच्याबाबतीत जीवनदृष्टी आणि वाङ्मयीन दृष्टी एकसारखी असल्याचे लक्षात येते.[४] याचे कारण म्हणजे या दोन्हीचे केंद्रबिंदू एकच असल्याने फारसा फरक असत नाही असे म्हणता येईल. साहित्याकडे पाहण्याची एक स्वंतंत्र विशिष्ट दृष्टी असू शकते. याला वाङ्मयाच्या अभ्यासामध्ये आधिक महत्व आहे. साहित्याचे लेखक कोणते प्रयोजन डोळयासमोर ठेवून साहित्य लिहितो यावर साहित्याच्या निर्मितीचे स्वरूप अवलंबून असते. लेखकाच्या वाङ्मयीन दृष्टीचा परिणाम त्याच्या शैलीवर, त्यांनी निर्मिलेल्या व्यक्ती, घटना, प्रसंग या सर्व घटकांवर होत असल्याने या अभ्यासामध्ये वाङ्मयदृष्टी महत्वाची ठरते.

**वाङ्मयीन पर्यावरण (लेखकाची वाङ्मयीन जडणघडण)** :

लेखकाची वाङ्मयीन जडणघडण अभ्यासताना अभिरुची याकडे आधिक लक्ष द्यावे लागते. कारण लेखकाची अभिरुची ही त्यांच्या वाङ्मयीन जडणघडणीत महत्वाची ठरते. यासंबंधीचा शोध घेताना वाङ्मयीन पर्यावरण याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. लेखक ज्या काळात लेखन करीत होता त्या काळात वाङ्मयीन वातावरण होते.

त्याचबरोबर पूर्वकालीन, समकालीन व उत्तरकालीन वाङ्मयीन पर्यावरण वा वातावरण ध्यानात घेवून लेखकाचे वेगळेपण शोधणे अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे असे म्हणता येईल.

**स्वकालीन पर्यावरण :** कोणत्याही लेखकाचा अभ्यास करताना स्वकालीन पर्यावरण कोणते होते. या पर्यावरणामध्ये कोणत्या विचारधारा विकसित झाल्या होत्या याचा प्राधान्याने विचार करावा लागेल. समकालीन लेखकांनी काय कोणत्या विषयावर लिहिले आहे. याचा शोध घेतल्याशिवाय लेखकाचे वेगळेपण सिद्ध करता येणार नाही. बालसाहित्य लिहिणाऱ्या साहित्यिकाचा अभ्यास करायचा करायचा असेल तर बालसाहित्य म्हणून जी संकल्पना उदयास आली त्या संकल्पनेच्या आगोदरच्या व तिच्यामागे असलेल्या विचारविश्वाचा शोध घेणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे मानले जाते. त्या साहित्यिकाच्या समकालीन कोण आहेत? त्यांच्या लेखनातून कोणत्या जाणिवा प्रकट केल्या ? याचाही शोध घेणे आवश्यक आहे. ज्या त्या काळातील लेखक आपापल्यापरीने युगभान साहित्यातून प्रकट करीत असतात. लेखकाचे युगभान व वेगळेपण लक्षात येण्यासाठी स्वकालीन लेखकांचा अभ्यास करणे अगत्याचे आहे असे म्हणता येईल. **वाङ्मयीन पूर्व परंपरा ( पूर्वकालीन वाङ्मयीन पर्यावरण ) :** भोवतालच्या पर्यावरणासह वा काळासह लेखक समजून घेतला पाहिजे. कुठलाही काळ कधीच सुटा असत नाही. येणारे वर्ष हे आधीच्या वर्षाच्या पोटातून आलेले असते. येत असताना आधीच्या वर्षाचे काही गुण घेऊन आलेले असते. बदलाची वा परिवर्तनाची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणत्याही काळातील परिवर्तन हे त्या एकाच काळाशी निगडीत असत नाही त्या परिवर्तनाची नांदी पूर्वकाळा पासूनची असल्याने म्हणूनच पूर्व परंपरा अत्यंत महत्वाची आहे असे म्हणता येईल. ज्या लेखकाचा अभ्यास करावयाचा त्या लेखकाच्या आगोदर वाङ्मयीन घडामोडी घडलेल्या असतात त्या घडामोडी वाङ्मयीन पूर्वपरंपरा शोधणे, त्या आधी कायकाय घडले हे पाहणे महत्वाचे ठरते. म्हणजेच वाङ्मयीन पूर्व परंपरा पाहिल्याशिवाय लेखकाचे वेगळेपण वा मोठेपण ध्यानात येत नाही असे म्हणता येईल. प्रत्येक लेखक परंपरेपासून काही ना काही घेतलेला असतो. काही नाकारलेले असते याविषयीची कारणमीमांसा अभ्यासकांनी आपल्या संशोधनात करणे अपेक्षित असते. काही लेखकाच्या बाबतीत परंपरेशी तडजोडीचे धोरण स्वीकारल्याचे दिसून येते.

**समकालीन अभिरुची आणि साहित्यिक अभिरुची :**

प्रयोगशील साहित्यिक हे जसे पुर्वपरंपरेशी तडजोड करीत असतात तसे ते अभिरुचीशीही तडजोड करीत असतात. कुठल्याही कालखंडातील अभिरुचीचा विचार करीत असताना एक गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. ती म्हणजे कोणत्याही काळातील अभिरुची कधीच एकसंघ असत नसते. तिच्यामध्ये काही वाचक, रसिक मानसिक पातळीवर मागच्या कालखंडात रेंगाळत असतात. म्हणजे असे लेखक कवी एकाच वेळी पूर्व परंपरा याच्याशी तडजोड करीत मानसिक पातळीवर मागच्या कालखंडातील रसिकांच्या मानसिकतेशी संवाद साधत असतात. मदन हजारे यांनी स्वकालीन वा समकालीन कालखंडातील वाचकांच्या अभिरुचीशी संवाद कसे साधतात हे पाहणे आवश्यक आहे.

पण हेही तितकेच म्हत्वाचे आहे की, संस्कारसंपन्न कुटुंब, व्यवसाय वगैरे गोष्टी अभिरुचीच्या निर्मितीसाठी उपयोगास येत नाहीत. अभिरुचीची कसलीही परंपरा नसलेल्या घरात अण्णाभाऊ साठे, बहिणाबाई चौधरी असे ग्रामीण दलित साहित्याच्या प्रवाहातील साहित्यिकांना अभिरुचीची पूर्व परंपरा लाभलेली नाही असे असले तरी दर्जेदार साहित्य निर्मिती झाल्याचे दिसून येते. एका लेखकाचा अभ्यास करताना या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

साहित्यिकाची साहित्यिक अभिरुची कोणत्या स्वरुपाची आहे हे संशोधनातून निश्चित करणे आवश्यक आहे. त्याची अभिरुची जन्मजात आहे की, वाङ्मयीन पर्यावर्णातून विकसित झालेली आहे हे शोधणे महत्वाचे आहे. अभिरुची जन्मजात असेल तर ती विकासक्षम जरूर आहे असे म्हणता येईल. बालपणाची अभिरुची नंतरच्या काळात कशी बदलत गेली आहे ? तिच्यावर कोणते संस्कार झाल्याने तिच्यात बदल झालेला आहे, अभिरुचीने नवे वळणे घेतलेले आहे याचा तटस्थ राहून शोध घेणे महत्वाचे आहे.[५] म्हणूनच आपणास असे म्हणता येईल, अभिरुची ही एक संस्कारक्षम शक्ती आहे. साहित्यिकांची साहित्यिक अभिरुची साहित्य निर्मितीला कितपत उपयुक्त ठरलेली आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

**पूर्वकालीन संदर्भ आणि समकालीन संदर्भ :** एका विशिष्ट लेखकाचा अभ्यास करीत असताना निवडलेल्या एका विशिष्ट लेखकाच्या पूर्वकालीन संदर्भ आणि लेखकाच्या समकालीन संदर्भ याला अधिक महत्व आहे. असे संदर्भ घेताना

चरित्राची, दैनंदिनाची, वृत्तपत्रातील वृत्तांची, मुलाखतीची अशा इतर कोणत्याही साधनाची गरज भासल्यास हे साधन सामग्री हाताशी असणे गरजेचे आहे. ही केवळ अभ्यासविषय म्हणून समजून घेणे आवश्यक आहे. याचा फायदा असा होतो की, वरवर छोटा वाटणारा विषय किती व्यापक आहे हे आपल्या ध्यानात येते. एखादी बालकथा, वा बालकविता जरी रचनेच्या दृष्टीने अल्प असली तरी त्या बालकथेची वा कवितेची आशयाच्या दृष्टीने किती व्यापक आहे हे समजून येते. यामुळे आपला संशोधनाचा विषय वा अभ्यासविषय अधिकाधिक सूक्ष्म होऊन अभ्यासाच्या कक्षा अधिकच विस्तारल्या जातात. या विस्तारलेल्या कक्षासह आपणास अभ्यास करावयाचे आहे याची जाणीव होते.

**लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील विशेषत्व :**

लेखक परंपरेतून काही घेत असतो काही नाकारत असतो, पूर्व कालीन व समकालीन अभिरुचीला तो चांगल्या वाईट पद्धतीने सामोरे जात असतो. या सर्व प्रक्रियेतून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे 'विशेषत्व' हरवू न देता तो साहित्यनिर्मिती करत असतो. आपल्या निर्मितीतून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा ठसा उमटवीत असतो. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील विशेषत्व हेरणे संशोधनाला चालना देणारे असते.

**लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्यप्रकार :**

लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्यप्रकार याचा अतिशय जवळचा संबंध आहे. लेखकाला आलेला अनुभव आणि त्यांनी मानवी जीवनाचा लावलेला अर्थ याचा अविष्कार कसा करायचा या विचारप्रक्रियेतून एका विशिष्ट साहित्याप्रकारातून अविष्कार होत असतो. लेखकाचे विशेषत्व समजून घेण्यासाठी लेखकाला कोणते वाङ्मय प्रकार जवळचे वाटतात? त्यांची साहित्यनिर्मिती विशिष्ट वाङ्मयप्रकारातून का होते याचाही अभ्यासकाला छडा लावता येतो. काही साहित्यिक एका विशिष्ट साहित्य प्रकारातूनच साहित्यनिर्मिती करीत असतात तर काही साहित्यिक कथा कादंबरी, नाटक, ललित, समीक्षा अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारातून लेखन करताना दिसतात. अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व व्यक्त झालेले असते. सर्वच साहित्यप्रकारातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व विखुरलेले असते. त्याचा एकसंघपणे विचार करून शोध घेणे महत्त्वाचे आहे.

कोणत्या साहित्यप्रकारातून स्वत:ला नीटपणे आणि नेमकेपणे व्यक्त करता आलेले आहे हे पाहणे आवश्यक आहे. अभ्यासकांनी काढलेल्या निष्कर्षातून लेकखालाही योग्य दिशा मिळू शकेल. लेखकाच्या अनुभवला जशा मर्यादा आहेत तशा साहित्यप्रकाराला देखील मर्यादा असतात.विविध वाङ्मय प्रकार लेखकाने का हाताळले, कोणत्या गरजेपोटी विविध प्रकारातून लेखन केले, लेकखाने हाताळलेले साहित्यप्रकार नीटपणे हाताळलेले आहेत का ? साहित्यप्रकाराला न्याय देणे जमले आहे का ? या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. यातूनच लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व याविषयी मूल्यमापन करता येईल. कविता या प्रकारातून व्यक्त केलेल्या जाणीवा, कथेतून व्यक्त केलेल्या जाणीवा, कादंबरीतून व्यक्त केलेल्या जाणीवा वा नाटक साहित्य प्रकारातून व्यक्त केलेल्या जाणीवा यांची योग्य संगती लावणे अनिवार्य आहे. म्हणजेच लेखकांनी हातालेल्या साहित्यप्रकारातून एक समान असे अंत:सूत्र शोधणे अभ्यासकाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. अंत:सुत्राद्वारेच लेखकाचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व कोणत्या प्रकारचे आहे हे स्पष्ट करता येईल.

**भाषाशैली विषयीची प्रयोगशीलता :**

एका विशिष्ट लेखकाचा अभ्यास करताना साहित्यकृतीचा आकृतिबंध आणि जीवनाशय यांच्यामधील समन्वय असणे अधिक महत्वाचे आहे. कोणताही लेखक हा आपल्या साहित्यनिर्मितीद्वारे या दोन पातळीवर साहित्य प्रांतात भर घालीत असतो. ज्याला चांगले साहित्य म्हटले जाते त्यामध्ये आशय आणि शैली यांच्यामध्ये एकरूपता वा अद्वैतता असते. लेखकाने जीवनानुभव मांडताना भाषाशैलीच्या अंगाने कोणते वेगळे प्रयोग केलेले आहेत का? याचा शोध घ्यावा लागतो. कादंबरी, नाटक, आणि कविता या साहित्यप्रकारातून शैलीच्या दृष्टीने नवनवीन प्रयोग केलेले आढळतात. प्रयोगशीलता ही जीवनानुभावाला चकवा देणारी असता कामा नये. केवळ भाषिक पातळीवर केलेले प्रयोग हे सुंदर भांड्यातील शिळी कढी होणार नाही याची खबरदारी लेखकाने घेतली आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे.[६] एकूणच एका विशिष्ट लेखकाचा अभ्यास करताना या सर्व गोष्टीचे भान ठेवूनच मूल्यमापन करणे आवश्यक आहे. त्यासाठी अभ्यासकाने साहित्यकृतींचे अति सूक्षम वाचन करणे गरजचे आहे. एकच साहित्यकृती वेगवेगळया दृष्टीने वाचली पाहिजे तरच आपले संशोधन नेमकेपणाने आणि तटस्थपणे होईल.

**निष्कर्ष :**

१. लेखकाची जडणघडण समजून घेण्यास मदत होते.

२. लेखकाच्या साहित्याचा उत्पत्ती मार्गाचा वेध सहजपणे घेता येतो.

३. मुख्य म्हणजे साहित्य आणि लेखक यांच्यातील संबधाचा छडा लावता येतो.

४. साहित्यातील व्यक्त होणारे आशयसूत्र, शैली समजते.

**संदर्भ :**

१. मालशे,सं.ग.(अनुवादक),'साहित्य सिद्धांत' महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य मंडळ, मुंबई, दु.आ.२००२, पृ. क्र. ६८.

२. ढवळे,वि.ना.(डॉ), कुलकर्णी वा.ल.,जोशी, रा.भि. व इतर संपादक मंडळ सदस्य, 'शेक्सपिअर परिचय', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई-३२, फेब्रुवारी १९७९, प्रस्तावना, पृ.क्र.७

३. आवलगावकर,अविनाश (डॉ.),'मराठी साहित्य संशोधन: नव्या दिशा' प्रतिमा प्रकाशन; पुणे ३०., नोव्हेंबर२००६, पृ.क्र.११५

४. तत्रैव, पृ. क्र. ११७

५. कुलकर्णी अ.वा., साहित्यविचार, साहित्यिक अभिरुची, प्रतिमा प्रकाशन, पुणे – ३०, द्वितीय आवृत्ती – जुलै, १९९७, पृ.क्र. १४९.

६. आवलगावकर अविनाश (डॉ.), 'मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा', उ.नि., पृ.क्र. १३१.